Vol 2 Issue 10 April 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 10, April. 2013
ISSN:-2231-5063
Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# मानव विकास निर्देशांकांची स्थिती : भारत व महाराष्ट्र

*अतुल संगनाथ नौबदे*

संशोधक विद्यार्थी
पदव्युत्तर अर्थशास्त्र संशोधन केंद्र आबासाहेब गरवारे महाविद्यालय,कर्वे रोड, पुणे.

*सारांशः*

मानवाच्या सर्वच व्यवहाराचे अंतिम उदिष्टय, मानव विकास हेच असते ', हे जरी सत्य असले तरी मानव विकास ही बहुअंगी संकल्पना असल्यामुळे त्याची मोजदाद करणे तेवढी सोपी प्रकिया नाही. याला मूर्त रुप देण्याच्या गरजेतुनच सन 1990 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम (UNDP) यानी पहिला मानव विकास अहवाल प्रकाशित केला. या अहवालात मानव विकास म्हणजे काय ?मानव विकास निर्देशांक कसा मोजायचा ?तो कसा तयार करावा ?यासंबंधी सविस्तरपणे उहापोह केलेला आहे. [1] मानव विकास निर्देशांक तयार करण्याचे कार्य विख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉ. मेहबूब उल हक्क यांनी केले. तर नोबेल पारितोषिक विजेते व कल्याणकारी अर्थशास्त्राचे पुरस्कर्ते डॉ. अमर्त्य सेन यांच्यामुळे त्याला शास्त्रीय स्वरुप प्राप्त झाले.

## *प्रस्तावना :–*

जगातील विविध देशांकडून संकलित केलेल्या सांख्यिकी माहितीच्या आधारे संयुक्त राश्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) यांच्यामार्फत 1990 पासून दरवर्षी मानव विकास अहवाल तयार करण्यांत येतो. आर्थिक चर्चा, निती आणि समानता इ. च्या माध्यमातून देशाचा विकास साध्य करण्याच्या उद्‌देशाने या अहवालाची निर्मिती करण्यात येते. या अहवालातील निर्देशांकाच्या आधारे जगातील देशांची विविध चार गटात वर्गवारी केली जाते. अहवालात अत्यंत महत्वाच्या विविध घटकावर केलेला उहापोह हा वर्तमान व भविष्यातील सर्वागीन विकासासाठी महत्वाचा आहे. त्यामुळे या अहवालांचे अनन्यसाधारण महत्व आहे. अहवालातील संदेश आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठीच्या साधनांचा स्वीकारि जगभरातल्या लोकांकडून करण्यांत आला आहे. याचा पुरावा म्हणजेच 120 पेक्षा जास्त देशात राष्ट्रीय मानव विकास अहवालाचे प्रकाशन होय. तसेच स्थानिक पातळीवर जिल्हा व तालुका स्तरावर पण मानव विकास अहवाल तयार करण्यांत येत आहेत. थोडक्यात असे म्हणता येईल की, मानव विकास ही संकल्पना जागतिक स्तरावरुन गाव पातळीवर पोहोचली आहे.

प्रस्तुत लेखनामध्ये भारताच्या मानव विकास निर्देशांकाची स्थिती व वार्षिक वाढ, भारतातील प्रमुख राज्याचे मानव विकास निर्देशांक व भारत व महाराष्ट्र यांच्या निर्देशांकाची तुलना करण्यांत आलेली आहे.

## *1.अभ्यास पध्दती :–*

प्रस्तुत अभ्यास हा भारताच्या मागील 30 वर्षापासूनचा व महाराष्ट्राचा 10 वर्षाचा आढावा घेणारा असल्यामुळे तो पुर्णतः दुय्यम साधनसामुग्रीवर आधारीत आहे. सदर अभ्यासासाठी प्रामुख्याने खालील दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यांत आलेला आहे.

अ)संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम यांचे विविध अहवाल
ब)भारत सरकारने मानव विकास संबंधीतचे अहवाल
क)महाराष्ट्र शासनाचा मानव विकास संबंधीत अहवाल
ड)मानव विकास संबंधीत तज्ञांनी पुस्तके
इ)संकेतस्थळावरील माहिती
ई)वृत्तपत्रातील सदर विषयातील तज्ञांचे लेख

## *2.मानव विकासाची व्याख्या :–*

मानव विकास या संकल्पनेच्या विविध अर्थशास्त्रज्ञांनी व्याख्या केलेल्या आहेत. या संकल्पनेचे प्रणेते व प्रसिध्द अर्थतज्ञ डॉ. मेहबूब उल हक्क यांच्या मते, " विकासाचा मुख्य उद्‌देश मानवास जास्तीत जास्त संधी उपलब्ध करुन देणे. या संधी अर्माद व वेळेनुरुप बदलता येणा–या असाव्यात. मानवाची मिळकत ही उत्पन्न वाढीच्या अंकात दिसण्याऐवजी त्यां ज्ञान वृध्दी, उत्तम आहार व आरोग्य सुविधा सुरक्षित

Title :मानव विकास निर्देशांकांची स्थिती : भारत व महाराष्ट्र
Source:Golden Research Thoughts [2231-5063] अतुल संगनाथ नौबदे yr:2013 vol:2 iss:10

जीवनमान , शारीरीक वेदना व गुन्हेगारीपासून सुरक्षितता, फावला वेळ घालविण्याचे समाधान, राजकीय व सांस्कृतिक स्वातंत्र्य आणि समाजात मिसळण्याची जाणीव यात दिसेल. तसेच विकासाचा मुख्य उद्‌देश मानवासाठी अशा सामाजिक वातावरणाची निर्मिती करणे ज्यात आरोग्यसंपन्न व नाविन्यपुर्ण जीवन जगता येईल. '' अशी केलेली आहे. तर संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम यांच्या सन 1990 च्या पहिल्या मानव विकास अहवालानुसार, '' मानव विकास म्हणजे लोकांना मिळणा–या संधीचा परीघ मोठा करण्याची एक प्रक्रिया होय. ''[2]

### *3.मानव विकास निर्देषांक व ते ठरविण्याचे पैलू :*[3]

मानव विकास हा मानव विकास निर्देशांकाच्या सहाय्याने मोजण्यांत येतो मानव विकास निर्देशांक म्हणजे ' लोकांचे आरोग्य, शिक्षणाचा कालावधी, साक्षरतेचे प्रमाण व दरडोई उत्पन्न इ. च्या मुल्यात होणा–या बदलाचे मापन करण्यासाठी उपयोगात येणारी गणितीय पध्दती होय .' तसेच ' मानव विकास निर्देशांक हा स्थूलमानाने आयुर्मान, ज्ञान प्राप्ती व चांगले राहणीमान या तीन सामाजिक घटकांची सरासरी होय. ' या तीन पैलूच्या आधारे मानव विकास निर्देशांक मोजण्यांत येतो.

अ)लोकांचे आरोग्य – मानवाचा विकास झाला म्हणजे त्याचे आरोग्य चांगले, उत्तम

असायला हवे. पण हे आकडयात मोजायचे कसे यासाठी आयुर्मान हा मोजण्याचा निकश निश्चित करण्यांत आला. हे सरासरी आयुर्मान 25 ते 85 वर्श यामध्ये मोजले जाते. मानवाचे वाढते आयुर्मान हे विकासाचे द्योतक मानले जाते.

ब)लोकांचे ज्ञान – मानवाचा विकास झाला म्हणजे लोकांच्या ज्ञानात होणारी वाढ. हा मोजण्यासाठी प्रौढ साक्षरता दर व संयुक्त पटनोंदणी प्रमाण या निकशांना अनुक्रमे 2 / 3 व 1 / 3 महत्व देवून निर्देशांक काढण्यात येतो.

क)चांगले राहणीमान – हा दर्जा लोकांच्या वस्तू व सेवा यांच्या उपभोगावर अवलंबून असतो. हा मोजण्यासाठी देशांतर्गत स्थूल दरडोई उत्पन्न हा निकश विचारात घेण्यांत . हे 100 ते 40000 डॉलर यामध्ये मोजण्यांत येतो.

या तीन्ही पैलूंना 0 ते 1 या मूल्यादरम्यान प्रमाणित करण्यांत येते व त्यांची सरासरी काढून मानव विकास निर्देशांकांचे मुल्य 0 ते 1 च्या दरम्यान निश्चित करतात. निर्देशांक 1 असला तर तो सर्वात चांगला समजला जातो व देशांची क्रमवारी 1 पासून शून्यापर्यंत गुणानुसार लावली जाते. निर्देशांकानुसार देशांची वर्गवारी अत्युच्च विकसित देश, उच्च विकसित देश, मध्यम विकसित देश, अल्प विकसित देश या चार गटात करण्यांत येते.

### *4.भारताच्या मानव विकास निर्देषांकांची स्थिती व वार्शिक वाढ :*[4]

सन 1980 ते 2011 पर्यंत भारताच्या मानव विकास निर्देशांकातील स्थिती व वार्शिक वाढ या बाबी खालील कोश्ठकात दर्शिवण्यांत आलेल्या आहेत.

कोष्ठक क.1 भारताच्या मानव विकास निर्देशांकाची स्थिती

| | वर्ष | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1980 | 1990 | 2000 | 2005 | 2009 | 2010 | 2011 |
| भारताचा HDI | 0.344 | 0.410 | 0.416 | 0.504 | 0.535 | 0.542 | 0.547 |

;संदर्भ UNDP यांचा जागतीक मानव विकास अहवाल 2011 पृ.क.133)

वरील कोंष्टकाच्या आधारे खालील आकृती काढता येईल.

***आकृती क.1***
भारताच्या मानव विकास निर्देशांकाची स्थिती

उपरोक्त कोष्ठक क.1 मध्ये 1980 पासून 2011 पर्यंत भारताच्या मानव विकास निर्देशांक बाबत आढावा घेण्यांत आलेला आहे. सन 1980 मध्ये भारताचा मानव विकास निर्देशांक 0.344 होता म्हणजे तो अति निम्न स्थितीमध्ये होता. सन 1990 मध्ये 0.410 एवढी वाढ झालेली आहे. या दहा वर्षाच्या कालावधीत भारताच्या मानव विकास निर्देशांकाच्या स्थितीत सकारात्मक स्थितीत वाढ झाली पण ती खूपच अल्प प्रमाणात आहे. सन 1980 ते 1990 व 1990 ते 2000 या दोंन दशकातील निर्देशांकाच्या वाढीसंबंधी तुलना करता असे स्पष्ट होते की, सन 1980 ते 1990 या दशकातील निर्देशांकांतील वाढ ही जास्त म्हणजेच 0.066 एवढी आहे, तर 1990 ते 2000 मध्ये ही वाढ केवळ 0.006 एवढी आहे. सन 2000 नंतर मात्र भारत देशांच्या मानव विकास निर्देशांकात चांगली वाढ झालेली आहे. या वाढीचे मुख्य कारण म्हणजे सन 2000–2010 या दशकामध्ये भारताने शिक्षण, आरोग्य, उत्पन्न इत्यादीत केलेले सहेतुक प्रयत्न होय. सन 2011 च्या जागतीक मानव विकास अहवालानुसार जगातील 187

देशाच्या यादीमध्ये भारत अजूनही 134 व्या स्थानी आहे. भारताने 1980 ते 2011 पर्यंत मानव विकास निर्देशांकाबाबत अति निम्न देशाच्या गटातून प्रगती करुन मध्यम गटांच्या देशाच्या यादीमध्ये आपले स्थान निर्माण केलेले आहे, ही एक उल्लेखनीय बाब आहे. पण एकविसाव्या शतकातील महासत्ता म्हणून जगातील देश भारत व चीन या दोन शेजारी राष्ट्राकडे पहात आहे.सन 2011 च्या मानव विकास अहवालानुसार चीनचा निर्देशांक हा 0.687 एवढा असून हा देश 101 व्या स्थानी आहे. या देशाला उच्च विकास गटामध्ये जाण्यासाठी 0.113 ( 0.800 निर्देशांक प्राप्त करण्यासाठी ) एवढया प्रमाणात निर्देशांकात वाढ अपेक्षित आहे.तर भारतास मात्र 0.253 ( 0.800 निर्देशांक प्राप्त करण्यासाठी ) एवढया मोठया प्रमाणात वाढ अपेक्षित आहे.

कोष्ठक क.2 आकृती 2.

उपरोक्त कोष्ठक क.2 वरुन असे स्पष्ट होते की, भारताचा मानव विकास निर्देशांक सन 1980 ते 2011 या 31 वर्षाच्या कालावधीमध्ये 1.51 : इतकी वार्षिक वाढ झालेली आहे. तर सन 1990 ते 2011 या 21 वर्षाच्या कालावधीत मात्र ती 1.38 : वर आलेली आहे. तर सन 2000 ते 2011 या 11 वर्शाच्या दशकात चांगली वाढ होवून ती 1.56 : एवढी झाली आहे.

### *1.राष्ट्रीय मानव विकास अहवालात महाराष्ट् राज्याचे स्थान :* [5]

भारत देशाने संयुक्त राष्ट् विकास कार्यक्रम (UNDP) यांच्या साहयाने 23 एप्रिल 2002 रोजी पहिला स्वतंत्र मानव विकास अहवाल प्रकाशित केला. तर 2011 मध्ये दुसरा अहवाल प्रकाशित केला आहे. या दोन्ही राष्ट्रीय मानव विकास अहवालात महाराष्ट् राज्याची स्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण मानव विकास निर्देशांक वाढीसाठी ज्याप्रमाणे देशाने जाणीवपुर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे राज्यांनी सुध्दा करणे आवश्यक आहे. कारण जर राज्यांचा मानव विकास निर्देशांक वाढला तर देशांच्या निर्देशांकांत निश्चितच सकारात्मक स्थितीत वाढ होताना दिसून येईल.

***कोष्ठक क. 3***

राज्यांच्या मानव विकास निर्देशांकाची स्थिती (1999–2000 व 2007–2008)

| राज्याचे नाव | मनव विकास निर्देशांक 1999–2000 | मनव विकास निर्देशांक 2007–2008 |
|---|---|---|
| आंध्रप्रदेश | 0.368 | 0.473 |
| आसाम | 0.336 | 0.444 |
| बिहार | 0.292 | 0.367 |
| छत्तीसगड | 0.278 | 0.358 |
| दिल्ली | 0.783 | 0.750 |
| गोवा | 0.595 | 0.617 |
| गुजरात | 0.466 | 0.527 |
| हरियाना | 0.501 | 0.552 |
| झारखंड | 0.268 | 0.376 |
| कर्नाटक | 0.432 | 0.519 |
| केरळ | 0.677 | 0.790 |
| मध्यप्रदेश | 0.285 | 0.375 |
| महाराष्ट् | 0.501 | 0.572 |
| ओरिसा | 0.275 | 0.362 |
| पंजाब | 0.543 | 0.605 |
| राजस्थान | 0.387 | 0.434 |
| तामीळनाडू | 0.480 | 0.570 |
| उत्तरप्रदेश | 0.316 | 0.380 |
| पश्चिम बंगाल | 0.422 | 0.492 |
| हिमाचल प्रदेश | 0.581 | 0.652 |
| जम्मू कश्मिर | 0.465 | 0.529 |
| उत्तराखंड | 0.339 | 0.490 |
| भारत | 0.387 | 0.467 |

(संदर्भ : 2011 चा भारताचा मानव विकास अहवाल पान क. 257 )

वरील कोश्ठक आकृतीच्या साहायाने खालीलप्रमाणे मांडण्यांत येईल.

*आकृती क. 3*

राज्यांच्या मानव विकास निर्देशांकांची स्थिती (1999—2000 व 2007—2008)

वरील तक्ता क.2 व आकृती क.3 वरुन असे स्पष्ट होते की,सन 2007—2008 मध्ये केरळ राज्याचा मानव विकास निर्देशांक हा सर्वाधिक म्हणजे 0.790 इतका आहे. हा निर्देशांक सन 1999 – 2000 मध्ये 0.677 एवढा होता. याच अनुक्रमाने विचार केल्यास दिल्ली या केंद्रशासित प्रदेशाचा मानव विकास निर्देशांक 0.750 एवढा आहे. तो सन 1999—2000 च्या तुलनेत 0.023 एवढी घट झालेली आहे. याचे कारण म्हणजे शिक्षण व उत्पन्न विकास निर्देशांकांत झालेली घट होय. त्यानंतर हिमाचल प्रदेश, गोवा व पंजाब राज्यांचा क्रमांक लागतो. सन 2007—2008 मध्ये महाराष्ट्राचा निर्देशांक 0.572 एवढा आहे व राज्याचा 7 वा क्रमांक लागतो. तर सन 1999—2000 मध्ये 0.501 एवढा होता व राज्याचा 06 क्रमांक लागत होता. तर विकास निर्देशांकाची ख्राब स्थिती ही बिहार, उत्तरप्रदेश, छत्तीसगड व झारखंड या राज्यांचा आहे. पण सकारात्मक स्थिती म्हणजे राज्यातील निर्देशांकांच्या स्थितीमध्ये सन 1999—2000 च्या तुलनेत सन 2007—2008 मध्ये वाढ झालेली आहे.

*1.भारताच्या व महाराष्ट्राच्या मानव विकास निर्देशांकाची तुलना :*

भारताचा मानव विकास निर्देशांक व महाराश्ट्र राज्याचा मानव विकास निर्देशांक यांची तुलना खालील आकृतीच्या साहायाने करण्यांत आलेली आहे.

*आकृती क. 4*

भारत व महाराष्ट्र यांच्या मानव विकास निर्देशांकाची तुलना (1999—2000 व 2007—2008)

वरील आकृती क.4 वरुन असे स्पष्ट होते की, एकूण भारताच्या तुलनेत महाराष्ट्र राज्याचा मानव विकास निर्देशांक हा सन 1999—2000 व 2007—2008 मध्ये चांगला स्थितीमध्ये आहे. सन 1999—2000 मध्ये महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक 0.501 इतका होता तर भारताचा 0.387 इतका होता व सन 2007—2008 मध्ये अनुक्रमे 0?572 व 0.467 इतका आढळून येतो. निर्देशांकाची खराब स्थिती म्हणजेच निर्देशांक 1 स्थानाने खाली घसरला आहे. तर चांगली स्थिती म्हणजे हा निर्देशांक भारताच्या सरासरी निर्देशांकापेक्षा अधिक आहे.

थोडक्यात वरील सर्व कोष्ठके व आकृत्यांचा विचार करता असे म्हणता येईल की, भारताच्या मानव विकास निर्देशांकात सकारात्मक स्वरुपात वाढ झालेली असून ती वाढ मंद स्वरुपाची आहे. या वाढीला गती देण्यासाठी सर्व स्तरावर विशिष्ट कार्यक्रमांचा आराखडा तयार करुन तो अंमलात आणणे आवश्यक आहे. तसेच भारताच्या तुलनेत महाराष्ट्राच्या मानव विकास निर्देशांकाची स्थिती निश्चित चांगली आहे. पण केरळ, दिल्ली, गोवा, हिमाचल प्रदेश या राज्यांच्या मानव विकास निर्देशांकाची स्थिती ही महाराष्ट्राच्या मानव विकास निर्देशांकापेक्षा अधिक चांगली आहे. त्यामुळे या राज्यांनी मानव विकास निर्देशांक वाढविण्याच्या दृष्टीने काही जाणीवपुर्वक प्रयत्न केलेले आहेत काय ?केले असतील तर ते कोणते ? समाजातील कोणत्या स्तरापर्यंत करण्यांत आलेले आहेत ?तसे प्रयत्न महाराष्ट्रात करता येतील काय ?याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक असून महाराष्ट्र राज्याचा मानव विकास निर्देशांक वाढीच्या अनुशंगाने जाणीवपुर्वक प्रयत्न करणे ही काळाजी गरज आहे तसेच म्हणावे लागेल.

*संदर्भ ग्रंथ सूची :*

1.अर्थशास्त्र इयत्ता अकरावी, (2008) नरेंद्र प्रकाशन, पुणे—02. (पृ.क. 18)
2.Human Development Report 1990 (1990) UNDP, New York, Oxford University Press, Oford (P.10)
3.डॉ. विनायक गोविलकर, मानव विकास निर्देशांक अर्थबोध, (2009) दैनिक सकाळ वृत्तपत्रातील लेख.
4.Human Development Report 2011 Sustainability and Esuity: A Better Future for all (2011) UNDP New York, USA.(P.133)
5.India Human Development 2011 Towards Social Inclusion (2011) Oxford University press, New Delhi.(P.257)
6.www.undp.org.in
7.Aparna Bhardwaj & Anil Kumar Thakur, Amartta Sen and Human Development (2012), Deep & Deep Publication Pvt. Ltd, New Delhi.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net